# जावे त्याच्या गांवा ... (डॅलस)

## ‘फोर्ट वर्थ’चा मराठी समाज
## आणि
## शहरातील अन्य आकर्षणें

फोर्ट वर्थ शहरात मराठी लोक लक्षणीय संख्येने १९८५ पासून आले. दोन डॉक्टर्स आणि सुमारे पंधरा इंजिनिअर्सच्या पेशात ही मराठी मंडळी होती. डॅलस, फोर्ट वर्थ महाराष्ट्र मंडळाची स्थापना १९८७ला झाली. प्रभाकर घाटे, दिलीप पाटणकर यांचा मंडळाच्या स्थापनेत पुढाकार होता. त्यावेळेस डॅलस आणि फोर्टवर्थ या दोन शहरात मिळून केवळ ८० मराठी कुटुंबे होती. १९९०च्या सुमारास येथील नुक्लिअर विद्युत् प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आणि त्या प्रकल्पावरील दहा मराठी कुटुंबे अन्य राज्यात स्थलांतरीत झाली. त्याच सुमारास संगणक संबंधित क्षेत्रातील उद्योगास मागणी वाढत गेल्याने या क्षेत्रात काम करणारे मराठी लोक फार मोठ्या प्रमाणात या भागात आले. परंतु ते लोक डॅलस, प्लेनो, अरव्हिंग या भागातच राहिले. हल्ली फोर्ट वर्थ शहरात अक्षरश: बोटावर मोजता येतील अशी सहा मराठी कुटुंबे आहेत.

फोर्ट वर्थ शहरातील प्रेक्षणीय ठिकाणें - येथील ‘कल्चरल डिस्ट्रिक्ट’ या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या भागात ‘ऑम्नि थिएटर’(145 Screen), फोर्ट वर्थ म्युझियम ऑफ सायन्स अँड हिस्टरी, ‘Amon’ कार्टर म्युझियम, ‘Casa Mannana’ थिएटर/नाट्यगृह. तेथून जवळच प्रसिध्द बोटॅनिकल गार्डन/पार्क आहे. फोर्ट वर्थ स्टॉक यार्ड आणि म्युझियम हे ठिकाण अमेरिकन लोकांच्या विशेष आवडीचे आहे.

**- कुमार जोशी (डॅलस)**

***

## लहान तोंडी मोठा 'D' (डॅलस)

डॅलस - फोर्टवर्थ महानगर म्हणजे डॅलस, फोर्टवर्थ आणि आजूबाजूची शहरे मिळून बनलेला भाग. यापैकी डॅलस आणि फोर्टवर्थ या दोन शहरामधील अंतर २५ मैलांचे. वाढती लोकसंख्या आणि वेगाने होणाऱ्या शहरांची वाढ यामुळे या सर्व शहरांतील सीमारेषा आता एवढ्या पुसट झाल्या आहेत की या महानगरात राहणाऱ्या माणसाला त्या जाणवतही नाहीत. ‘डॅलस काऊबॉईज’ नाव धारण करणाऱ्या संघाचे नवे कोरे स्टेडीयम आता आर्लिंग्टन या शहरात आहे. पूर्वी ते अर्विंग या शहरात होते. ही बाब ह्या पुसट सीमारेषांची जाणीव अधिकच ठळकपणे करुन देते.

कित्येक टेलिकॉम कंपन्यांची मोठमोठी ऑफिसेस मिळून बनलेला टेलिकॉम कॉरीडॉर तसेच टेक्सास इंस्ट्रुमेंटस्, एक्झॉन, अमेरिकन एअरलाईन्स, साऊथवेस्ट एअरलाईन्स, किंबर्ले क्लार्क, जे. सी. पेनी, ब्लॉकबस्टर, रेडिओशॅक आणि इतर अनेक फॉर्च्युन ५०० कंपन्यांची मुख्यालये या शहरात आहेत. येथील भक्कम औद्योगिक वातावरण आणि त्यामधील वैविध्य बघता २०२५ पर्यंत हे महानगर लोकसंख्येनुसार अमेरिकेतील चौथ्या क्रमांकाचे शहर असेल ह्या भविष्यवाणीबद्दल शंका वाटत नाही.

उन्हाळ्यात अत्यंत उष्ण आणि हिवाळ्यात बऱ्यापैकी थंड हवामान असणारे हे महानगर वर्षातून कित्येक दिवशी ४० डीग्री फॅरनहाईटचे चढउतार सहजपणे दाखवते. त्यामुळेच गारा, चक्रीवादळे आणि अफाट वारा अशा नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाण्याची तयारी इथल्या रहिवाश्यांना ठेवावी लागते. त्याचप्रमाणे इथल्या भुसभुशीत जमिनीमुळे अमेरिकेतील इतर शहरांमधील घरांना असणाऱ्या बेसमेंटच्या सोयीलादेखील इथल्या रहिवाश्यांना मुकावे लागते.

मायरसन सिंफनी सेंटर, अर्विंग आर्टस सेंटर, एटी अँड टी परफॉरमिंग आर्टस सेंटर, बास परफॉमन्स हॉल, गारलँड स्पेशल इव्हेंटस् सेंटर, आइझमन सेंटर ह्या व इतर काही संस्थामुळे छोट्या ते अतिशय मोठ्या प्रमाणावर प्रेक्षकांची सोय करता येईल असे कार्यक्रम (नृत्याचे, शास्त्रीय संगीताच्या मैफिली) इथे सहजपणे पार पाडता येतात. तसेच अगदी नवीन असे जगातील एकमेव उभे थिएटर नावाजले जाणारे वायली थिएटर म्हणजे नाटककार आणि नाट्यरसिक यांच्यासाठी पर्वणीच.

बेसबॉल, फुटबॉल, बास्केटबॉल, सॉकर, आईस हॉकी ह्या खेळामधील व्यावसायिक संघाना हे महानगर आधार देतेच पण त्याबरोबरच क्रिकेट आणि कॅरम हे भारतीय लोकप्रिय खेळही इथे मोठ्या प्रमाणावर जोपासले जातात. नॉर्थ टेक्सास क्रिकेट असोसिएशन आणि काऊबॉईज कॅरम क्लब ह्या संस्था ह्या खेळांच्या चाहत्यांना योग्य त्या संधी आणि सोयी उपलब्ध करुन देतात. खेळाप्रमाणेच भारतीय कला प्रकारातील भरतनाट्यम्, कथ्थक व इतर नृत्यप्रकार आणि शास्त्रीय संगीतातील गायन, विविध वाद्ये, सुगम संगीत शिकण्या व शिकवण्याची सोय इथे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. पंधरा ऑगस्टच्या आसपास होणारा ‘आनंद बझार’ आणि दिवाळीच्या आसपास होणारा ‘दिवाळी मेळा’ ह्या कार्यक्रमांना येथील भारतीय ३० ते ८० हजारांच्या संख्येने हजेरी लावतात.

डॅलसला भेट देणाऱ्या प्रत्येकाला अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांची हत्या जिथे झाली त्या डिले प्लाझाच्या परिसरास भेट देण्याची उत्सुकता असते. केव्हिन कोस्टनरचा जेएफके हा चित्रपट पाहून जर ही भेट दिली तर ती अधिक माहितीपूर्ण ठरते असा कित्येकांचा अनुभव आहे. त्याचबरोबर जवळच्याच ग्लेन रेज या ठिकाणी असलेले ‘फॉसिल रिम वाईल्डलाइफ सेंटर’ ही जागा देखील ‘एक दिवसाची सहल’ म्हणून पर्यटकांना खूप आवडते.

आपण कधी टेक्सासमध्ये वाट चुकलात, तर आमच्या डॅलसला भेट द्यायला विसरु नका. डॅलसमधील लोक आपलं दोन्ही हात पसरुन स्वागत करतील याची मला खात्री आहे.

**- किरण साठे (डॅलस)**